महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- pronanded@gmail.com

जा. क्रं./ प्रेस नोट / 213 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक :– 18 / 06 / 2024

# 1)घरफोडी :–

**किनवट** :– दिनांक 16.06.2024 रोजी चे रात्री 10.30 ते दिनांक 17.06.2024 सकाळी 05.30 वा. चे दरम्यान, **आयप्पा स्वामी मंदीर साईनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने आयप्पा स्वामी मंदिराचे पाच कुलूप तोडुन अर्धा किलो चांदीचे मुकूट, तीन ग्रॅम सोने अलामारीचे कुलूप तोडुन व दानपेटीतील रक्कम असे एकुण 1,33,300/–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी विलासराव मुकूंदराव नेमानिवार, वय 64 वर्षे, व्यवसाय शेती रा. साईनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 162/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गोटके, मो. नं. 9146663555** हे करीत आहेत.

# 2)जनावर चोरी :–

**सोनखेड** :– दिनांक 16.06.2024 रोजी चे 19.30 ते दिनांक 17.06.2024 रोजी चे 06.00 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे शेतातील आखाडयावरून मौ. सोनखेड ता. लोहा **जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील आखाडयावर दोन गाई व दोन गोरे बांधुन घरी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चार जनावरा पैकी एक गाय व एक गोरा किंमती 40,000/–रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर शंकरराव मोरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 87/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2342 हंबर्डे, मो.क्रं. 9284422052** हे करीत आहेत.

# 3)मो.सा.चोरी :–

**भोकर** :– दिनांक 16.06.2024 रोजी चे सायंकाळी 10.00 वा. ते दिनांक 17.06.2024 रोजी चे पाहाटे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरासमोरून महम्मदनगर मुदखेड रोड ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपनीची मोटार सायकल क्रं. एमएच.– 26/एल–0220 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी युसूफ पठाण पिता खैरूल्ला खान, वय 56 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. महम्मदनगर मुदखेड रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 179/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 नामदेव जाधव, मो.नं. 9850493110** हे करीत आहेत.

# 4)चोरी :–

**1)धर्माबाद** :– दिनांक 16.06.2024 रोजी चे 03.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **श्री स्वामी समर्थ मंदिराच्या शेजारी कृषी उत्पन्न बाजार समिती धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे गोदामातुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गोदामाच्या मागील बाजुस असलेल्या व्हेंटीलेशन येथुन खिडकीची गजाळी तोडुन आत प्रवेश करून समोरील बाजुस असलेल्या शटर मधुन 14 क्विंटल सोयाबीनचे 67 पोते किंमती 70,000/–रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत दिगंबरराव पाटील, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापारी ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 138/2024 कलम 379, 461 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कारामुंगे, मो.क्रं.** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 16.06.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **बालाजी मंदीर जुना मोंढा ते नोव्हेल्टी दुकान वजिराबादचे समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी ॲटो रिक्षा क्रमांक एमएच–26/बीडी–7486 मध्ये बसुन जुना मोंढा ते वजिराबाद मार्गे विष्णुनगर नांदेड येथे जात असतांना तीन अनोळखी महिला पैकी कोणत्यातरी एका महिलेने फिर्यादी बाईची नजर चुकवून त्याच्या पर्स मधील चार तोळयाचे सोन्याचे गंटण 40 ग्रॅम वजनाचे जुने वापरते किंमती 1,20,000/–रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शोभा सुभाषराव पिंपरवार, वय 55 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. आखाडा बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 279/2024 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/412 कानगुलवार, मो.क्रं. 9922710204** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**इस्लापुर :– दिनांक 01.08.2016** चे 00.00 ते दि. 17.06.2024 चे 10.30 चे दरम्यान, **जयभिमनगर तामसा ता. हदगाव ह. मु. साठेनगर नवी आबादी इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस थापड बुक्यानी मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ करून माहेरहुन एक लाख रूपये ॲटो घेण्यासाठी घेऊन ये म्हणुन फिर्यादीस तिचे दोन मुलासह घरातुन हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 59/2024 कलम 498(अ), 323, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चौदंते, मो.क्रं. 9823391458** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**मनाठा :–** दिनांक 16.06.2024 रोजी चे 03.00 वा. चे सुमारास, **बामणी शिवार एचपी पेट्रोल पंपाजवळ ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संजय लक्ष्मण टारपे, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पांगरी तांडा ता. हदगांव जि. नांदेड** हा आणि त्याची पत्नी व नातेवाईकाची मुलगी असे त्यांचे मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीपी–9856 वर बसुन त्यांची सासरवाडी जांब येथुन गाव पांगरे येथे वारंगा ते हदगाव रोडने बामणी शिवारातील एचपी पेट्रोल पंपा समोर सार्वजनिक रोडवर आले असता यातील बस क्रमांक एमएच–26/बीई–2343 चे चालकाने त्याचे ताब्यातील बस हयगय व निष्काळजी पणाने भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मोटार सायकलला समोरून जोराची धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत झाला. मयताची पत्नी व नातेवाईकाचे मुलीस गंभीर जखमी केले. वगैरे **फिर्यादी दीपक लक्ष्मण टारपे, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पांगरी ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं. 87/2024 कलम 279, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9970073425** हे करीत आहेत.

## 7)प्राणी संरक्षण कायदा :–

**विमानतळ :–** दिनांक 17.06.2024 रोजी चे 13.45 वा. चे सुमारास, **अमेना शाळेजवळ महेबुबनगर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या स्वतःचे आर्थीक फायदया करीता गोवंश जातीचे दोन बैल जनावरे एकुण किंमती 80,000/–रूपयाचे कत्तल करण्याच्या उद्देशाने घेवुन जात असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2166 श्री दारासिंग लच्छमाजी राठोड, ने. पोस्टे विमानतळ** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 191/2024 कलम कलम 5(अ), 9 प्राणी संरक्षण अधिनियम 1976 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1334 जाधव, मो. नं. 9923078806** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 17.06.2024 रोजी चे 14.25 वा. चे सुमारास, **ग्रामपंचायत समोरील रोडवर वाजेगांव ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल व दोन पितळी धातुची जिवंत काडतुस किंमती 27,000/–रू मुद्येमाल ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/170 संतोष शिवन्ना बेलुरोड, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 491/2024 कलम 3/25, 7/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कोरे, मो.क्र. 8888836607** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 17.06.2024 रोजी चे 15.50 वा. चे सुमारास, **वाजेगांव बायपास नवीन पुलाखाली नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी तलवार, खंजर किंमती 600/–रू चे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3376 चंद्रकांत सुभाष स्वामी, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 492/2024 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ**/173 माने, मो.क्र. 8788371187** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**हिमायतनगर :–** दिनांक 17.06.2024 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **मौजे सरसम ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी/विदेशी दारू किंमती 29,890/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2303 अशोक पि. शेषेराव सिंगनवाड, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 135/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.नं. 7350671239** हे करीत आहेत.

## 10)विज पडुन मृत्यु :–

**माहुर :–**दिनांक 17.06.2024 रोजी चे 16.30 ते 17.00 वा. चे दरम्यान, **मौ. शेख फरीद वझरा शेत शिवार माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे आनंद तुकाराम मुंडे, वय 18 वर्षे, रा. शेख फरीद वझरा माहुर ता. माहुर जि. नांदेड,** हा शेतात सरकी लावत असतांना अचानक अंगावर विज पडल्याने मरण पावला आहे. वगैरे **खबर देणार हरिष तुळशिराम मुंडे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेख फरिद वझरा ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माहुर** आ. मृ. **14**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/764 जाधव, मो.नं. 7887687478** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड